JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# किल्ले रायगडावरील स्थापत्य आणि वास्तुविशेष

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.

**प्रस्तावना** -

स्थापत्य म्हणजे स्थापन केलेले, तयार केलेले वास्तू, निवास या संदर्भात हा शब्द वापरला जातो. बांधकाम हा अगदी बोली भाषेतील शब्द दोन्ही अर्थ सांगता येईल. बांधकाम कसे करावे, त्यासाठी कोणत्या वस्तू वापराव्यात, मोजमापे, स्तंभ यासंबंधीचे शास्त्र म्हणजे स्थापत्यशास्त्र होय. हे एक पूर्ण विकसीत झालेले शास्त्र आहे. भारतात स्थापत्याची विशेष परंपरा शेकडो वर्षापासून आहे. प्रागैतिहासीक काळापासून वास्तु निर्मिती होत होती. त्या काळातील मानवाने स्वत:साठी जो निवारा बांधला तो एक स्थापत्याचाच प्रकार होता. पुढे जस जशा गरजा वाढल्या तस-तसे वास्तूत बदल होत गेले. बांधकामाची नियमावली तयार झाली आणि शास्त्र तयार झाले. बांधकामाचा अनुभव, बदल, तंत्रातील प्रगती यामुळे आज परिपूर्ण स्थापत्य आपल्याला पहावयास मिळते.
भारतीय स्थापत्याचे प्रकार पाहायचे झाल्यास स्थूल मानाने दोन मुख्य प्रकार मानता येतात. एक म्हणजे धार्मिक स्थापत्य आणि दुसरे लौकिक स्थापत्य होय.
रायगड हा अतिशय मजबूत अभेद्य असा किल्ला असून या किल्ल्याचे बांधकाम देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्यामध्ये रायगडाच्या उंचच उंच पायऱ्या, बुरुज, नाना दरवाजा, धान्य कोठार, मशीद मोर्चा, मदनशहाची कबर, महादरवाजा, बुरुज, लोहस्तंभ, हत्ती तलाव, गंगासागर, मनोरे, पालखी दरवाजा, मेना दरवाजा, राणीवसा, राजभवन, रत्नशाळा, सदर महाल, राजसिंहसन, नगारखाना, शिरकाई, सचिवांची घरे, दारूचे कोठार, कुशावर्त तलाव, ब्राह्मण वाडा, बाजारपेठ, पिलखाना, जगदीश्वर मंदिर आणि शिवाजी महाराजांनी ज्या ठिकाणी शेवटचा श्वास घेतला ते ठिकाण आणि शिवाजी महाराजांची असलेली समाधी हे सर्व रायगडाच्या स्थापत्य आणि वास्तुविशेष वैशिष्टे आहेत.

**किल्ले रायगडावरील स्थापत्य** -

रायगड हा किल्ला प्रचंड उंच असलेल्या डोंगरावर असून समुद्रसपाटीपासूनची उंची 870 मी. आहे. नाना दरवाजापासून दीड कि.मी. अंतरावर चढून गेल्यास त्याठिकाणी दोन इमारतीचे भग्नावशेष पाहावयास मिळतात. या दोनपैकी एक इमारत 12 मी. लांबीची असून ती पहारेकऱ्यांची खोली असावी. दुसरी इमारत 22.35 मी. लांबीची व 6 मी. रुंदीची असून ती इमारत धान्याचे कोठार असल्याची शक्यता आहे. हे भग्नावशेष पाहून थोडे पुढे गेल्यानंतर मशीद मोर्चा नावाची एक जागा दिसते. लेखक रेमन याने इ.स. 1818 मध्ये या मोर्चाचा उल्लेख केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मशीद मोर्चाजवळ मुसलमान लोकांसाठी एक मशीद बांधलेली होती, असे म्हटले जाते. या ठिकाणी मदनशहा नावाच्या एका मुस्लिम पीर बाबांची कबर आहे. या कबरीपासून 400 मी. अंतरावर असलेल्या एका खडकात 3 गुहा खोदलेल्या आहेत. या गुहांचा उपयोग धान्य कोठारांसाठी केला जात असावा. ज्या खडकामध्ये 3 गुन्हा खोदलेल्या आहेत, त्या गुहाजवळ उत्तरेस चढणाची वाट लागते. या गुहेपासून 1 कि.मी. अंतरावर महादरवाजा लागतो. या दरवाजाकडे जाताना उंच चढ लागतो. महादरवाजाला दोन मोठे बुरूज, त्यापैकी एक बुरूज 23 मीटर उंच व दुसरा बुरूज 20 मी. उंच आहे. या बुरुजावर शत्रूवर मारा करण्यासाठी

झरोके ठेवलेले दिसतात. या झरोख्यातून मराठी सैनिक शत्रूवर गोळीबार करीत असत. या दरवाजाची कमान टोकदार असून तिच्या बांधकामावर मुस्लिम स्थापत्य पद्धतीचा प्रभाव जाणवतो. महादरवाजाच्या कमानीच्या दोन्ही बाजूस गंडभेरूडाची शिल्पे कोरलेली असून अशा प्रकारची मध्ययुगातील अनेक किल्ल्यावर कोरलेली आढळतात. अशी शिल्पे यादव कालखंडातील स्थापत्यामध्ये प्रथम कोरलेले आढळतात. विजयनगर साम्राज्यात बांधलेल्या अनेक किल्ल्यामध्येही अशा प्रकारची शिल्पे कोरलेली दिसतात. डोंगराच्या खालून किल्ल्याचे दर्शन होत नसल्याने त्यामुळे शत्रूंना या किल्ल्याच्या दरवाज्यावर तोफांचा भडीमार करता येत नाही. महादरवाजातून जाणारा रस्ता हाच किल्ल्याचा मुख्य रस्ता आहे. दक्षिण बाजूस त्याला चोर दरवाजा म्हटले जाते. संकटप्रसंगी अशा चोरवाटांचा उपयोग केला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या बहुतेक किल्ल्यांना एकापेक्षा अधिक दरवाजे ठेवलेले दिसतात.

जगदिश्वर मंदिरातील शिलालेखात या मनोऱ्याचा स्तंभ असा उल्लेख केलेला आढळतो. तिसरा एक मनोरा किंवा स्तंभ बालेकिल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या निवास स्थानाजवळ दिसतो. हा मनोरा भग्नावस्थेत असून त्याच्या मध्यभागी कारंज्यांचे अवशेष दिसतात. बालेकिल्ल्याच्या बाहेर दोन्ही बाजूस असलेल्या स्तंभाच्या तळमजल्यापासून बालेकिल्ल्यात जाण्यासाठी दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. मनोऱ्यापासून पश्चिमेस बालेकिल्ल्याकडे जाणारा 32 पायऱ्यांचा एक जिना लागतो. बालेकिल्ल्यात प्रवेश करताना चिरेबंदी दगडाची कमान असलेला पालखी दरवाजा आहे. या दरवाजातून छत्रपती शिवाजी महाराज आणि राजकुटुंबातील मंडळी जात येत असावीत. या दरवाजाच्या बाहेरील बाजूस पहारेकऱ्यासाठी असलेल्या खोल्या दिसतात. या खोल्यात बसून पहारेकरी पालखी दरवाजातून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवीत असत.

पालखी दरवाज्यातून प्रवेश केल्यानंतर बालेकिल्ल्यात जाता येते. पालखी दरवाज्यापासून 150 मी. अंतरावर दक्षिणेस मेना दरवाजा लागतो. बालेकिल्ल्यातून बाहेर जाण्यासाठी राजघराण्यातील स्त्रिया या प्रवेशद्वाराचा उपयोग करीत असाव्यात. या दरवाजाबाहेर आल्यानंतर एक छोटे मैदान दिसते. या मैदानास येऊन राजघराण्यातील स्त्रिया सूर्यास्ताची शोभा पाहात असाव्यात. पालखी दरवाजापासून मेना दरवाजाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या हातास सहा वाड्यांचे भग्नावशेष दिसतात. त्यांना **राणीवसा** म्हणतात. या वास्तू छत्रपती शिवाजी महाराजांच्या राण्यांसाठी बांधलेल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड ही राजधानी केल्यानंतर त्या ठिकाणी अनेक इमारती बांधल्या. त्याचे वर्णन सभासद बखरीमध्ये करण्यात आलेले आहे. या वर्णनामध्ये असलेल्या अनेक वास्तूचे अवशेष आजही रायगडावर पाहावयास मिळतात.

किल्ले रायगडची चढण लागल्यानंतर काही अंतरावर खुबलढा बुरूज आहे. हा बुरूज संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत मोक्याच्या जागेवर असून या ठिकाणी खिंडीमुळे डोंगर तुटलेला दिसतो. या बुरुजाची उंची 8.25 मी. तर परीघ 15.25 मी. आहे. पेशवे दप्तरामध्ये या बुरुजासंबंधीचे अनेक उल्लेख आढळतात. याच बुरुजाला लागून **चीत् दरवाजा** या नावाचे एक प्रवेशद्वार होते; परंतु आज हा दरवाजा तेथे अस्तित्वात नाही. या दरवाजालाच 'चिते दरवाजा' या नावानेही ओळखले जाते. नाना दरवाजाचे मूळ नाव 'लहाना दरवाजा' असे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाप्रसंगी इंग्रजाचा प्रतिनिधी म्हणून हेन्री ऑक्झेंडन हा उपस्थित होता. त्याने आपल्या डायरीमध्ये लहान दरवाजा असा उल्लेख केलेला आढळतो. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराला ‘महादरवाजा’ असे म्हटले जाते. त्यामुळे या दरवाजाला लहान दरवाजा असे नाव पडल्याची शक्यता आहे. पेशवे दप्तरात या दरवाजाचा उल्लेख ‘नाने दरवाजा’ या नावाने केलेला आढळतो. या दरवाजाला दोन कमानी असून या दोन कमानी पहारेकऱ्यांसाठी खोल्या खोदलेल्या आढळतात.

रायगड किल्ल्याच्या अचूक मूल्याचा अंदाज लावणे जवळजवळ अशक्य आहे, जे भारताच्या आश्चर्यकारक स्थळांपैकी एक आहे आणि ऐतिहासिक घटना आणि पौराणिक योद्ध्यांच्या कथांचे साक्षीदार आहे. हे समुद्रसपाटीपासून 2,700 फूट किंवा 820 मीटर वर जाते, सुंदर सह्याद्री पर्वतराजी पार्श्वभूमी म्हणून रायगड किल्ल्याकडे जाणाऱ्या जवळपास 1,737 पायऱ्या आहेत. रायगड रोपवे हा एक हवाई ट्रामवे आहे. जो 750 मीटर लांबीचा आणि 400 मीटर उंच आहे. यामुळे पर्यटकांना रायगड किल्ल्याला जमिनीच्या पातळीपासून काही मोजक्याच ठिकाणी पोहोचण्यास मदत होते. या किल्ल्याची किंमत देशातील इतर सर्व प्रतिष्ठित स्मारकांप्रमाणेच अनमोल आहे. जर आज त्याचा अंदाज लावला गेला तर तो कित्येक लाखांमध्ये जाईल यात शंका नाही.!

**किल्ले रायगडावरील वास्तुविशेष** -

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या हिंदुस्थानच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे हिंदुस्थानच्या अन्य भागातून आलेल्या कारागीरांनी आपली कला स्वराज्यात वास्तुशिल्प घडविण्यात उपयोगात आणली असावी. असे राजगडावरील वास्तुविशेष पाहिल्यावर दिसून येते. त्याचप्रमाणे वास्तुविशेषाचे असलेले महत्त्व समजून येते.

1. **रायगडावरील जगदिश्वर मंदिर** -

रायगडावरील जगदीश्वर मंदिर हेमाडपंथी स्थापत्य प्रकाराचे असून त्याची उभारणी मुस्लिम शिल्प पद्धतीची आहे. या मंदिराच्या मुख्य प्रवेश द्वाराच्यावर दोन्ही बाजूस मिनार कोरलेले आहेत. तसेच मशिदीच्या कळसाप्रमाणे या मंदिराच्या चारही बाजूस कळस बांधलेले आहेत. शिवाजी महाराज हे हिंदू - मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते असल्याने या मंदिराचे शिल्पकाम मुस्लिम पद्धतीचे करण्यात आले, असे म्हटले जाते.

2. **रायगडावरील नगारखाना** -

रायगड किल्ल्यावर सिंहासनाच्या पूर्व दिशेला नगारखान्याची चौकोनी आकाराची 16.5 मीटर उंचीची भव्य वास्तू आहे. नगारखान्याचे प्रवेशद्वार पूर्व दिशेला असून या प्रवेशद्वाराची कमान टोकाशी निमुळती होत गेलेली आहे. याच प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस भिंतीवर चौकोनी नक्षीकाम केलेले असून प्रत्येक बाजूस नेटक्या कोरलेल्या नऊ चौकोनाच्या दोन ओळी आहेत. मधील गाभ्याऱ्यावरील भागात हत्ती धरलेल्या सिंहाची आकृती कोरली आहे. सोबत कमळाचे शिल्प कोरले आहे. खरे पाहता सिंहापेक्षा हत्ती हा शरीराने मोठा असतो. पण या शिल्पात सिंह प्रचंड तर हत्ती छोटा दाखविला आहे. असे शिल्पीत करण्यामागे शिल्पकाराला काही सूचवायचे असावे. हत्ती हे पातशाहीचे प्रतीक असावे. या पातशाह्यांना सिंहासारखा पराक्रम गाजवून शिवाजी महाराजांनी नमविले व स्वतंत्र सार्वभौम राज्य निर्माण केले, हे या शिल्पाच्या माध्यमातून शिल्पकाराला सांगावयाचे असावे. या प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूला परकोट वजा नक्षीयुक्त भिंत असून तिला मारा करण्यासाठी झरोके ठेवलेले आहेत. एकंदर नगारखान्याच्या प्रवेशद्वाराचे शिल्प अतिशय उठावदार असून कमानीचा आकार विजापूरच्या शिल्पशैलीची आठवण करून देतो.

3. **रायगडावरील मनोरे** -

रायगड किल्ल्यावर गंगासागर तलावाच्या दक्षिणेला 100 मीटर अंतरावर दोन मनोरे भग्नावस्थेत आहेत. या मनोऱ्याचे सध्या दोन मजले अस्तित्वात असून ते द्वादशकोनी पायावर उभे आहेत. या मनोऱ्याच्या प्रत्येक बाजूला मध्यभागी खिडकी ठेवली असून या खिडक्यांमध्ये पणत्या ठेवल्या जात असाव्या. या मनोऱ्याच्या बाहेरील बाजूस सुबक नक्षीकाम केलेले आहे. या मनोऱ्याचे बांधकाम खिडक्यांची रचना मुघल शिल्प शैलीप्रमाणे दिसते. जगदीश्वर मंदिरावरील शिलालेखात या मनोऱ्याचा स्तंभ म्हणून उल्लेख केलेला आहे. या मनोऱ्याच्या भिंतीतून तांब्याच्या नळ्या बसविलेल्या आहेत. या नळ्या मनोऱ्याच्या मध्यभागी असलेल्या कारंज्याना जोडलेल्या असाव्यात. या मनोऱ्यांचा जिथे दुसरा मजला सुरू होतो तिथे नक्षीकाम थोडे बाहेरील अंगास आणून कमळाच्या पाकळ्याप्रमाणे घडविलेली निमुळते टोके लोंबती सोडली आहेत.
रायगड किल्ल्यावरील नगारखान्याचे व मनोऱ्यांचे शिल्प **सारासीन** पद्धतीचे आहे. त्यामुळे मि. केनेडी यांस वाटते की, त्या इमारती शिवपूर्वकालीन असाव्यात किंवा त्या इमारती मुसलमान शिल्पकाराकडून घडविल्या असाव्यात. अशाच प्रकारचे मत जेम्स डग्लसने आपल्या '**बुक ऑफ बाँबे**'मध्ये व्यक्त केले आहे. तो लिहितो की, "रायगडावरील मुख्यतः नगारखान्याचे शिल्प कायरो अगर दमास्कस येथील शिल्पाचे स्मरण करून देते."

4. **स्वस्तिक** -

रायगड किल्ल्याच्या बालेकिल्ल्यावर कमळ, स्वस्तिक यासारखी शुभचिन्हे कोरली आहेत.

**5. राजमुकूट -**

रायगड किल्ल्याच्या दुसऱ्या पाली दरवाजावर टोकदार कमानीच्या वरील बाजूस राजमुकूटाच्या आकाराची आकृती कोरली आहे. कदाचित आपण स्वतंत्र राजे आहोत हे स्पष्ट करण्यासाठी शिवाजी राजांनी ही आकृती मुद्दाम कोरून घेतली असावी.

**6. शिलालेख -**

रायगड किल्ल्यावरील जगदिश्वर मंदिराच्या दरवाजाच्या उजव्या बाजूला संस्कृतमध्ये कोरलेला शिलालेख आहे. या शिलालेखावरून रायगडावरील बांधकामे हिरोजी इंदोलकरांनी आपल्या देखरेखीखाली केली हे समजते. सज्जनगड किल्ल्यावर एकूण तीन शिलालेख आढळतात. ते फारशी भाषेत कोरलेले असून त्यापैकी एक शिलालेख गड चढतांना दुसऱ्या वेशीच्या माथ्यावर असून या लेखाच्या भोवती नक्षीचे वेष्टन आहे. किल्ले सिंहगडच्या कल्याण दरवाज्यावरील गणेशपट्टीच्या माथ्यावर दोन ओळीचा शिलालेख कोरला आहे. रोहिडा (फारशी शिलालेख), अर्नाळा किल्ल्यावर देखील शिलालेख कोरलेला आढळतो.

**निष्कर्ष -**

थोडक्यात रायगड किल्ल्यावरील वास्तुविषेशाच्या संदर्भात असे म्हणता येईल की, आपल्या पूर्वजांनी ऐतिहासिक घटना कालक्रमानुसार लिहिण्याची परंपरा न जपल्याने अनेक किल्ल्यांच्या बाबतीत शिल्पे, वास्तू, त्यांचे मूळ निर्माते कोण, त्यांची निर्मिती नेमकी कोणत्या वर्षी झाली हे सर्व अज्ञात भूतकाळात दडलेले आहे. स्थापत्याप्रमाणे दुर्गस्थापत्य ही एका पिढीपुरते मर्यादित नाही. तर अनेक पिढ्यांनी परिश्रम घेतले आहेत. महाराष्ट्रातील किल्ल्यांवर शिल्पे अल्प प्रमाणात पहावयास मिळतात. कारण संरक्षण ही मुलभूत गरज मानून दुर्ग बांधणी केल्याने आणि तो कालखंड राजकीयदृष्ट्या धकाधकीचा असल्याने मंदिर व लेणी शिल्पाप्रमाणे राज्यकर्त्यांना दुर्ग शिल्पांकडे लक्ष देण्यास फुरसद मिळाली नसावी. त्यांनी फक्त किल्ले अधिक सक्षम मजबूत टिकाऊ कसे होतील याकडे लक्ष दिलेले दिसते. तरी देखील उपलब्ध असलेल्या दुर्ग शिल्पात मोठ्या प्रमाणात देवदवेतांची त्या खालोखाल प्राण्यांची व वनस्पतीची शिल्पे आढळतात. महाराष्ट्रातील बहुसंख्य दुर्ग बांधणीत आद्य, हिंदु, मुस्लिम, पोर्तुगीज, मराठा अशा विविध कालखंडातील शिल्प शैलीच्या भावछटांचा संगम रायगडावरील वास्तूविषेशावरून पहावयास मिळतो.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. Shete, Mohan - Historical Forts in Maharashtra, Adarsh Vidhyarthi Prakashan Pune, Edition 2011.
2. आवळसकर, शा. वि. - रायगडची जिवनगाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, दुसरी आवृत्ती 1974.
3. चितळे, श्रीपाद केशव - विदर्भातील किल्ले, मंगेश प्रकाशन, नागपूर, पुनर्मुद्रण 2009.
4. जाधव, नामदेवराव - शिवाजी द ग्रेट इंजिनिअर, राजमाता प्रकाशन, विक्रोळी (प.) मुंबई, 3 ऑक्टोबर 2014.
5. घाणेकर, प्र. के. - अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती 2005.
6. भोसले, प्रविण - दुर्गरचना, नरसिंह पब्लीकेशन्स, सांगली, डिसेंबर 2006.
7. मराठे, रा. वी. - स्थापत्यशिल्पकोश, साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई, पहिली आवृत्ती 1965.
8. महाडिक, जी. ए. - प्राचीन महाराष्ट्रातील कला, आधार पब्लिकेशन, अमरावती, प्रथमावृत्ती 2012.


***